# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

विभागीय कार्यालय. पुणे विभाग.

५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -४११०३७

दूरध्वनी - ०२० २४२०६८८०/८८१

Email:- pune.ro@mswc.in

**Website: mswarehousing.com**


## निविदा (Short Tender Notice)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे चिंचवड, टेल्को रोड, मोहन नगर, पुणे-४११०१९. या वखार केंद्रावरील गो.क्र.१ मधील ७००० चौ फुट जागा '**जसे आहे तसे**' या पद्धतीने लॉक अँन्ड की भाडे तत्वावर कमीत कमी भाडे दर रु.१८.८० पैसे प्रती चौ फुट प्रती माह + GST तसेच भाडे दरात प्रती वर्षी किमान ५% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (३+२)देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी इच्छुक असणाऱ्या निविदाकारांकडून सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत. एक वर्षाचे साठवणूक भाडे विना व्याज सुरक्षा तारण ठेव म्हणून महामंडळाकडे जमा करावे लागेल. गोदामातील मालाचा विमा,गोदाम सुरक्षा व्यवस्था ,पाणी-वीज देयकाची अदायगी ठेवीदाराला करावी लागेल.

तरी इच्छुक निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय. पुणे विभाग यांच्या वरील पत्त्यावरील कार्यालयात दि.०६.०२.२०२६ ते दि.१२.०२.२०२६ या कालावधीत सायंकाळी ५ वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) स्पर्धात्मक दरासहीत पोहोच होतील अश्या बेताने पाठवावेत किंवा प्रत्यक्ष पोहोच करावेत. प्राप्त निविदा/दरपत्रके विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांच्या कार्यालयात दि.१६.०२.२०२६ रोजी दुपारी ४ वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर केलेल्या तारखेला उघडण्यात येतील.त्यावेळी इच्छुक निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी विभागीय कार्यालय, पुणे येथे उपस्थित राहू शकतील.

सदर बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत तीन वर्षाचा Audited Report आणि IT Return ची प्रत तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र इ.आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत .

- गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- वरील निविदा कोणतेही कारण न देता ,स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

Dy. General Manager
Pune Ragion.